# एमएमआरसीएल करणार २ कोविड दक्षता सुविधा केंद्रांची उभारणी

**मुंबई** : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून दोन कोविड दक्षता सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात येत आहे. ही सुविधा केंद्र दहिसर चेकनाका, तर दुसरे बोरिवली आरटीओजवळ उभारण्यात येणार आहे. कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाचे काम एमएमआरसीएलकडून अत्यंत वेगाने सुरू असून कर्मचाऱ्यांना कोरोना प्रादुर्भावामुळे सोशल डिस्टन्सिंग पाळत काम करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. एमएमआरसीएलकडून ८०० खाटांचे विलगीकरण केंद्र दहिसर चेकनाका परिसरात, तर कंदरपाडा, बोरिवली आरटीओ कार्यालयानजीक २५० खाटांचा कक्ष उभारण्यात येणार आहे. येथे हाय डिपेन्डन्सी युनिट तसेच डायलिसिसची सुविधा असणारा अतिदक्षता विभागदेखील असणार आहे. तर दहिसर येथे ८०० पैकी २०० ऑक्सिजनिटेड खाटा असणार आहेत. या दोन्ही केंद्रांचे काम युद्धपातळीवर सुरू असून दोन आठवड्यांच्या आत हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. यापूर्वी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अर्थात एमएमआरडीएने १००० खाटांचे रुग्णालय बीकेसी येथे उभारले असून मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित केले आहे. तर आणखी १००० खाटांचे रुग्णालय बांधण्याची तयारी सुरू केली आहे.